नियमीत दिवाणी दावा क्र.३६३/२०१७ निशाणी क्र.५ वरील आदेश.

**(CNR NO.MHKO20-000809-2017)**

०१. वादी याने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई मिळणेकरिता दाखल केला आहे.

०२. वादीच्या अर्जाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे -

दावा मिळकतीचे वर्णन -

मौजे पोहाळे तर्फे बोरगावं, तालुका पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर येथील ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामपंचायत मिळकत क्र. २९५ क्षेत्र ६९ x ४४ फुट मधील दगड विट मातीचे कौलारु घर व खुली जागा. त्याची चतुःसिमा.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | रस्ता. |
| पश्चिमेस | - | आकाराम दादू पाटील यांचा ग्रा.पं.मि.नं.२९४. |
| दक्षिणेस | - | रस्ता. |
| उत्तरेस | - | शिवाजी राजाराम पाटील यांची मिळकत. |

येणेप्रमाणे चतुःसिमेतील घर मिळकत हयाला सोयीकरीता 'दावा मिळकत' असे संबोधले आहे.

०३. दावा मिळकत ही वडिलार्जीत मिळकत असून वादीचे आजोबा गणपती ज्ञानू पाटील हे मुळचे खातेदार होते. सदर मिळकत ही वादीचे वडिलांचे हिश्श्यास आलेली होती. परंतु, प्रत्यक्ष दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.२ यांच्या कब्जेवहिवाटीत आहे. दावा मिळकत ही ग्रामपंचायत रेकॉर्डला आजोबांचे नावे असलेल्या गोष्टीचा फायदा घेवून प्रतिवादी क्र.१ याने ती

मिळकत वादी व त्याचे वडिलांचे संमतीपत्राने त्याचे नावे करुन घेतली. प्रतिवादी क्र.१ याने त्याच्या नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेवून करवीर तालुका, मौजे बालिंगे येथील रि.स.नं. २५५ व कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील मिळकत प्रतिवादी क्र.५ ला तारण गहाण दिली. प्रतिवादी क्र. २, ३ व ४ आणि वादी यांना प्रतिवादी क्र.१ याने अंधारात ठेवून सदर मिळकत तारण देवून कर्ज घेतले आहे. सदर मिळकत ही वडिलार्जीत मिळकत असल्याने सदर मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा समान हिस्सा आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.१ ने करुन दिलेले तारण गहाण खत हे मुलतः बेकायदेशिर आहे. वाद मिळकतीमध्ये आजही वादी व प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचे कब्जेवहिवाटीत आहे. वादी, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेमध्ये अद्यापही सरस-निरस मानाने वाटप झालेले नाही अशी परिस्थिती असताना प्रतिवादी क्र.५ चे तथाकथित प्राधिकृत अधिकारी यांच्यामार्फत प्रतिवादी क्र.१ च्या नावे दिनांक १७.०४.२०१७ रोजी तहसिलदार, पन्हाळा यांचेमार्फत नोटीस वादीचे रहाते घरी बजावणीसाठी आली असता प्रतिवादी नं.१ ने वाद मिळकतीसह मौजे बालिंगे व कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील वादीचे वडिलार्जीत मालकी वहिवाटच्या मिळकती तारण गहाण देवून प्रतिवादी क्र.५ कडून कर्ज घेतलेची बाब निदर्शनास आली. त्याबाबत अधिक चौकशी केली असता प्रतिवादी क्र.१ ने तथाकथीत कर्जाचे फेडीसाठी वादीचा हिस्सा मिळू नये या हेतूने मौजे बालिंगे येथील स.नं.२५५ व कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं.८५८/२ व ८५९/२ अ पैकी प्लॉट नं.९४ या मिळकतीची विक्री केलेली आहे ही बाब वादीचे निदर्शनास आली. दि.१७/०४/२०१७ रोजी वादीने प्रतिवादी क्र.१ कडे आपला हिस्सा मागणी केला असता प्रतिवादी क्र.१ ने उडवाउडवीची उत्तरे दिली म्हणून वादीने दावा मिळकतीमधील आपला हिस्सा अलग व पृथ्थक करुन मागणीसाठी व प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी नं.५ चे लाभास करुन दिलेले तथाकथीत गहाणखत हे वादीचे हिश्श्यवर बंधनकारक नाही व वादीचा सामाईकातील हिस्सा प्रतिवादी क्र.१ यास गहाण देण्याचा हक्क नाही व त्यामुळे सदरचे

गहाणखत वादीने हिश्श्यावर बंधनकारक नाही असे जाहीर होवून मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ व ५ यांनी संगनमताने बेकायदेशीर कारवाई करुन वादीस रहात्या घरातून बाहेर (oust) करण्याचा प्रयत्न चालविला आहे. म्हणून वादीने दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीमधील वादीचे सामाईक शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादीनी हरकत अडथळा करु नये म्हणून प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई मागितली आहे.

०४. प्रतिवादी क्र. १ व २ हे न्यायालयात हजर झाले परंतु, त्यांनी त्यांची कैफीयत दाखल न केलेने त्यांचेविरुध्द 'विना कैफीयत' असा आदेश करणेत आला. प्रतिवादी क्र.५ यास दाव्याचे समन्स लागू होवूनही ते दावे कामी हजर न झालेने प्रतिवादी क्र.५ विरुध्द(ex-parte) एकतर्फा आदेश पारित केला.

०५. प्रतिवादी क्र. ३ व ४ हे न्यायालयात हजर झाले व त्यांनी त्यांची कैफीयत तुर्तातुर्त मनाई अर्जास आपले म्हणणे नि.क्र.१९ वर दाखल केले व दाव्यातील सर्व कथने मान्य केली आणि दावा मिळकतीत त्यांचा हिस्सा सरस-निरस मानाने वाटप होवून मिळावा ही मागणी केली आहे.

०६. वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला व प्रतिवादी क्र. ३ व ४ तर्फे विधीज्ञ श्री. ए. एन. नाईक यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाच्या निकालासाठी माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले त्यांचे उत्तर कारणांसहित पुढिलप्रमाणे सांगता येईल.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रथमदर्शनी केस ही वादीच्या बाजूने आहे काय ? | ..नाही. |
| २ | वादीचे बाजूने न्यायाचा तराजू आहे काय ? | ..नाही. |
| ३ | मनाई आदेश पारीत न केलेस वादीचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय ? | ..नाही. |
| ४ | आदेश कोणते ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

मुद्दा क्र. १ ते ४ बाबत -

०७. प्रस्तुत अर्जातील आणि प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी दाखल केलेल्या म्हणणेमधील मजकूराचे अवलोकन केले. वादीने आपल्या कथनाचे पुष्टर्थ स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे व या व्यतिरीक्त मौजे पोहाळे तर्फे बोरगाव, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील ग्रामपंचायत मिळकत नं. २९५ चा ८ड चा उतारा, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.५ चे लाभात करुन दिलेल्या तथाकथीत गहाणखताचे इंडेक्स-२ चा उतारा, प्रतिवादी क्र.१ ने ग्रामपंचायत पोहाळे यांना दिलेला अर्जाची झेरॉक्स प्रत, प्रतिवादी क्र.५ तर्फे तहसिलदार, पन्हाळा यांनी दिलेल्या नोटीसीची प्रत आणि वादीचे आजोबाचे नावाचा ग्रामपंचायत I उतारा इ. कागदपत्र दाखल केले आहेत. वादीतर्फे दाखल केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले.

०८. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीच्या वाटपाकरिता, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.५ यांचेसोबत केलेले तथाकथित तारण गहाणखत वादीवर बंधनकारक नाही असे जाहीर होवून मिळणेकरिता व वादीचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र. १ व ५ यांची हरकत व अडथळा करु नये व दावा मिळकतीमधून वादीस हुसकावून लावू नये म्हणून प्रतिवादी क्र. १ व ५ यांचे तुर्तातुर्त मनाई मिळणेकरिता दाखल केला आहे.

०९. वादीच्या कथनानुसार दावा मिळकतीचे आजतागायत वाटप झालेले नसून दावा मिळकत ही वडिलार्जीत मिळकत असून ती वादी व प्रतिवादीची एकत्रीत मिळकत आहे. प्रतिवादी क्र. १ ने वादीचे वडिलांकडून संमतीपत्र घेवून ती मिळकत स्वतःचे नावावर करुन घेतली व त्यासंदर्भात प्रतिवादी क्र. १ ने ग्रामपंचायत पोहाळे यांना दिलेली अर्जाची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व त्याचाच फायदा घेवून प्रतिवादी क्र.१ चे परस्पर वादी व प्रतिवादी क्र. ३ व ४ याची संमती न घेता प्रतिवादी क्र.५ बॅक ऑफ महाराष्ट्र यांचेकडे दावा मिळकत व अर्जातील नमुद मिळकत या गहाण ठेवून त्यावर कर्ज काढले व त्यासंदर्भात वादीने तथाकथीत गहाणखताचा इंडेक्स २ चा उतारा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ५ चे तथाकथीत प्राधिकृत अधिकारी यांच्यामार्फत प्रतिवादी क्र. १ च्या नावे दि.१७.४.२०१७ रोजी तहसलिदार, पन्हाळा यांचेमार्फत नोटीस वादीचे रहाते घरावर बजावनीस पाठविली तेंव्हा वादीस प्रतिवादी क्र.१ ने परस्पर मिळकती प्रतिवादी क्र. ५ कडे गहाण ठेवून कर्ज काढलेचे समजले. वादीने या कथनाचे पुष्टर्थ वादीने ती नोटीस निशाणी क्र.३ वर दाखल केली आहे.

१०. वादीचे कथनानुसार दावा मिळकती ही वडिलोपार्जीत मिळकत असलेने त्याचा

दावा मिळकतीवर अविभाज्य हक्क असलेचे प्रतिवादी क्र.१ कडे वादीने वाटणी मागीतली. परंतु, प्रतिवादी क्र. १ ने टाळाटाळ केली म्हणून वादीने हा दावा वाटपाकरिता व प्रतिवादी क्र. १ व ५ यांच्यामध्ये तथाकथीत गहाणखत वादीवर बंधनकारक नसलेचे जाहीर होवून मिळावे व प्रवितादी क्र. १ व ५ यांनी दावेचे अंतिम निकालापावेतो वादीचे दावामिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करु नये म्हणून तुर्तातुर्त मनाई मागितली आहे.

११. प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनीही प्रस्तुत दावेतील व तुर्तातुर्त मनाई अर्जातील कथने ही बरोबर असून दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होवून त्याचा कायदेशीर हिस्सा मिळावा अशी मागणी केली.

१२. वादीने दाव्यात व अर्जात आणि प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी त्यांचे म्हणणेमध्ये दावा मिळकत ही वडिलार्जीत असून दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा समान हिस्सा आहे आणि वादी, प्रतिवादी क्र.१ व ४ यांचेमध्ये अद्यापही सरस-निरस मानाने वाटप झालेले नाही असे कथन केले आहे. वादीने त्याचे व प्रतिवादीचे असलेल्या वडिलार्जित मिळकतीमध्ये व दावा मिळकतीमध्ये सरस-निरस मानाने वाटप होणेकरिता दावा दाखल केला आहे. दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप होवून मिळावे अशी त्यांचे म्हणणेमध्ये दाद मागीतली आहे. वादी व प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचेत दावेतील व म्हणणेमधील कथनांमध्ये दावा मिळकतीमध्ये त्यांच्या समान हिस्सा असलेचे सांगून दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झालेचे नसलेबाबत उल्लेखित केले आहे व वादी व प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी मान्य केले आहे. यावरुन दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे हिस्से हे निश्चित झाले नसलेचे प्रथमदर्शनी दिसून येते. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे सामाईकात

असताना ते दावा मिळकतीचे सहहिस्सेदार असताना त्यांचा दावा मिळकतीत प्रत्येकाचा अविभाज्य हिस्सा असताना अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ विरुध्द तुर्तातुर्त मनाई देता येत नाही. वादीने अर्जात नमुद केलेल्या कथनांमध्ये प्रतिवादी क्र. १ व ५ यांनी संगनमताने बेकायदेशीर कारवाई करत आहे असे कथन केले परंतु तुर्तातुर्त मनाई ही प्रतिवादी क्र. १ व ५ यांनी वादीचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये यासंदर्भात मागितली आहे. परंतु, दावा मिळकतीस वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे हिस्से ठरलेले नाहीत आणि दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यात सामाईक कब्जे वहिवाटीस आहेत. अशा परिस्थितीत प्रस्तुत प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई देता येत नाही.

१३. एकुणच वरील सर्व बाबींचा उहापोह करीता वादीच्या व प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्याच कथनानुसार वादी व प्रतिवादी यांचा दावा मिळकतीत समान हिस्सा व अविभाज्य हिस्सा असताना व ते दावा मिळकतीचे सहहिस्सेदार असताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकती संदर्भात कोणतेही सरस-निरस मानाने वाटप झाले नसताना प्रस्तुत प्रतिवादीविरुध्द कोणतीही तुर्तातुर्त मनाई देता येत नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ व ३ चे निष्कर्ष नकारार्थी देवून मुद्दा क्र. ४ करीता पुढील आदेश पारीत करतो.

## आदेश

वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/-
(एस. व्ही. जंगमस्वामी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळे (खेरीवडे).

दि.२०.०८.२०१८.

I Affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | K. B. Chavan |
| Name of Court | Civil Judge, Junior Division & Judicial Magistrate, First Class, Kale(Kherivade). |
| Date of Dictation | 20/08/2018. |
| Order signed by the P.O. On | 24/08/2018. |
| Order uploaded on | 30/08/2018. |